# ६. वस्तू

**द. भा. धामणस्कर** (१९३०) :

प्रसिद्ध कवी. भावोत्कटता, चिंतनशीलता व प्रांजळपणा यांमुळे धामणस्कर यांच्या कविता वाचकांच्या मनाला स्पर्श करतात. सामाजिक तणावांमुळे आलेली अस्वस्थता व्यक्त करताना संवेदनक्षम मनाला येणारी व्याकूळता आणि अभिव्यक्तीतील संयम ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये होत. त्यांची कविता १९८० साली प्रथम 'कविता दशकाची' या संग्रहातून ठसठशीतपणे वाचकांच्या परिचयाची झाली. 'प्राक्तनाचे संदर्भ' व 'बरेच काही उगवून आलेले' हे त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित आहेत.

ही कविता मुक्तछंद या प्रकारातील आहे. कोणत्याही निर्जीव वस्तूशी मानवी भावना जोडली गेली, की ती वस्तू अनमोल ठरते. वस्तू माणसाला दीर्घकाळ साथ देतात. व्यक्ती आणि वस्तू यांच्यामध्ये एक अतूट नाते तयार होते. त्यामुळेच थोर व्यक्तींच्या वापरातील वस्तू पुढे संग्रहालयात जतन केल्या जातात. वस्तूंनाही भावना असतात, हे समजून वस्तू वापराव्यात. वस्तूंशी निगडित स्नेह जपावा, ही भावना कवितेतून व्यक्त होते.

वस्तूंना जीव नसेलही कदाचित, पण
जीव नसल्यासारखे वागवू नये त्यांना.
वस्तूंना मनही नसेल कदाचित, पण ते
असल्यासारखे वागलो तर वस्तू
प्रचंड सुखावतात.
वस्तू निखालस सेवकच असतात आपल्या,
तरीही बरोबरीचाच मान द्यावा त्यांना.
वस्तूंना वेगळी, स्वतंत्र खोली नको असते,
त्यांना फक्त 'आपल्या मानलेल्या' जागेवरून
निष्कासित न होण्याची हमी द्या.
वस्तूंनाही असते आवड स्वच्छ राहण्याची,
हे हातांना लक्षात ठेवायला सांगा.
वस्तूंना जपावे, लाडावूनही ठेवावे त्यापुढे जाऊन.
त्याच जिवंत ठेवणार आहेत आपला स्नेह
नंतरच्या काळातही.
आयुष्य संपले की वस्तूंनाही आजवरच्या
हक्काच्या घरात राहू देत नाहीत, तेव्हा
कृतज्ञतापूर्ण निरोपाचा त्यांचा हक्क
शाबूत ठेवावा.



(भरून आलेले आकाश)

## कृती

### (१) आकृत्या पूर्ण करा.

(अ) वस्तूंची माणसासारखी असणारी वैशिष्ट्ये

(आ) वस्तूंजवळ माणसांसारख्या नसणाऱ्या गोष्टी

(इ) कवीने वस्तूंवर मानवी भावनांचे केलेले आरोप

### (२) कारणे लिहा.

(अ) वस्तूंना जपावे आणि त्यांचे लाडही करावेत, कारण............

(आ) वस्तूंना हक्काच्या घरात राहू दिले जात नाही, कारण............

### (३) काव्यसौंदर्य.

(अ) कवितेतील खालील ओळींचे रसग्रहण तुमच्या शब्दांत करा.

वस्तूंना मनही नसेल कदाचित, पण ते
असल्यासारखे वागलो तर वस्तू
प्रचंड सुखावतात.

(आ) 'वस्तूंनाही असते आवड स्वच्छ राहण्याची' याबाबतचा तुमचा दृष्टिकोन सांगा.

(इ) एखादी वस्तू बिघडल्यामुळे तुमची फजिती कशी झाली, याचे वर्णन करा.

(ई) तुमचा वर्गमित्र वर्गखोली/शालेय परिसरातील वस्तूंचे नुकसान करत आहे, या प्रसंगी तुम्ही काय कराल ते सांगा.

**उपक्रम :**

(१) तुमच्या घरातील आजी, आजोबा, पणजोबा यांच्या काळात असणाऱ्या वस्तूंची माहिती मिळवा.

(२) वस्तूंची नीट काळजी घेणाऱ्या आपल्या कुटुंबातील सदस्याची मुलाखत घेऊन संवादलेखन करा.

(३) तुमच्या घरातील अडगळीत टाकलेली वस्तू/विकायला काढलेली वस्तू जर तुमच्याशी बोलू लागली, तर ती काय बोलेल याची कल्पना करून लिहा.

- कंदील व विजेरी (बॅटरी) यांच्यातील संवादाची कल्पना करून संवादलेखन करा.





कंदील : ..............................................................................

विजेरी : ..............................................................................

कंदील : ..............................................................................

विजेरी : ..............................................................................

कंदील : ..............................................................................

विजेरी : ..............................................................................

कंदील : ..............................................................................

विजेरी : ..............................................................................

कंदील : ..............................................................................

विजेरी : ..............................................................................

कंदील : ..............................................................................

विजेरी : ..............................................................................

CYK3ZL